REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ३१ ऑगस्ट, १९३८ अंक ३५

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

CONFIDENCE
is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you :
NEW BUSINESS
Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
(ESTD. 1907)
Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
throughout India & the East.
S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
प्रोसेस प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे [illegible] रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'शांतवाडी' [illegible] सदाशिव पेठ.

'यश आलेंच पाहिजे.
मग महाराष्ट्रीय कमले ?'
अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची लागवड करतां आली.
तारीख १० जानेवारी १९३९च्या मकर–संक्रमणाला
बृहन्महाराष्ट्रीय साखर
व
१२५० एकर उंसाची नवी लागवड
यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजुरी दिली आहे.
रा. ब. काकासाहेब सहस्रबुद्धे डॉक्टर रा. ह. भडकमकर M.A., M.D. रा. ब. चि. कृ. मुळ्ये इंदोर. रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.
२५७ बुधवार पेठ, पुणें २. बेलबागेसमोर.

# विविध माहिती

**बँकांस सुटी**

सोमवार आणि मंगळवार, ता. ५ व ६ सप्टेंबर रोजीं पारशी वर्षारंभानिमित्त बँका बंद राहतील.

**असोसिएटेड सिमेंट कंपनीचे नवे अध्यक्ष**

असोसिएटेड सिमेंट कंपनीचे अध्यक्ष सर नौरोजी सकलातवाला ह्यांचे मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या जागीं सर एच. पी. मोदी ह्यांची निवडणूक झाली आहे.

**हिंदी बनावटीचे टेलिफोन**

टेलिफोनच्या यंत्रांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यास कलकत्ता येथील सरकारी टेलिग्राफ वर्कशॉपमध्यें लवकरच प्रारंभ होणार आहे.

**मंत्रिमंडळाकरितां बंगले**

मुंबई सरकारचे मंत्री आणि असेंब्लीचे व कौन्सिलचे अध्यक्ष अशा सात जणांसाठी मुंबई येथें बँकबे येथील हटवलेल्या समुद्राचे जागेवर क्रिकेट स्टेडियम पलीकडे, सात स्वतंत्र बंगले बांधण्यांत यावयाचे आहेत. प्रत्येक बंगल्यास खर्च ३० हजार रुपये येईल.

**पाण्याचा दर**

इंग्लंडमधील बहुतेक सर्व शहरांत पाण्याचा दर १,००० गॅलनांस २४ आण्यांच्या आसपास असतो. पुण्यांतील पाण्याचा दर १,००० गॅलनांस ८ आणे आहे.

**हिंदी वानरांची निर्गत**

हिंदी वानरांची निर्गत वाढत आहे. १९३०-३१ मध्यें १६½ हजार वानरें हिंदुस्थानाबाहेर रवाना झालीं; १९३६-३७ मध्यें ह्या निर्गतीचा आकडा २२½ हजारांवर गेला. ह्यांपैकी १४½ हजार वानरें अमेरिकेकडे गेलीं.

**सरकारी नोकऱ्यांची जातवार वाटणी**

बंगाल प्रांतिक असेंब्लीनें नुकताच एक ठराव मंजूर केला आहे, त्या अन्वयें सरकारी नोकऱ्यांतील जागांची वाटणी जातिनिहाय खालील प्रमाणांत व्हावी, असें ठरलें आहे:—मुसलमान: शेकडा ६०; शेड्यूल्ड जाती: शेकडा २०; इतर: शेकडा २०.

**पोस्टकार्डांची किंमत उतरवली तर उत्पन्नांत मोठी घट पडेल**

पोस्ट कार्डांची किंमत ९ पैची ६ पै केली, तर हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नांत त्यामुळें ५९½ लक्ष रुपयांची घट होईल, असा सरकारचा ताजा हिशेब आहे.

**ऑस्ट्रेलिया आणि हिंदुस्थान ह्यांमध्यें व्यापारी करार**

आस्ट्रेलिया देशाचें सरकार हिंदुस्थान सरकारशीं व्यापारी करार करण्यास तयार आहे, आणि त्याप्रमाणें त्या देशाच्या व्यापार-मंत्र्यांनीं हिंदुस्थान सरकारास कळवून वाटाघाटींसाठी समक्ष येण्याची आपली तयारी दर्शविली होती. तथापि, हिंदुस्थान सरकारची अद्याप तयारी नसल्याचें त्यांस उत्तर मिळालें.

**ग्रामसुधारणा ढाल**

ग्रामसुधारणेचे कामीं सर्वोत्कृष्ट कामगिरी ज्या खेडेगांवानें केली असेल अशा मुंबई प्रांतांतील तीन खेड्यांस दरसाल सर फ्रेड्रिक साइक्स ढाल देण्यांत येते. एक खेडें उत्तर विभागांतून निवडलें जातें, एका खेड्याची निवड मध्य विभागांतून होते आणि दक्षिण विभागांतील एका खेड्यास ढाल मिळते. १९३७ ची मध्य विभागासाठी ठेवलेली ढाल पुणें जिल्ह्यामधील खेड तालुक्यांतील खापुर्डी बुद्रुक ह्या गांवास मिळाली असल्याचें जाहिर झालें आहे.

**चीनमधील ब्रिटिश भांडवल**

चीनमध्यें ग्रेट-ब्रिटननें गुंतविलेल्या भांडवलाची किंमत सुमारें ४०० कोटि रुपये होती, ती चीनमधील युद्धामुळें आणि नासधुसीमुळें आतां निम्म्यानें कमी झाली आहे.

**नाशिक येथील नोटा छापण्याचा कारखाना**

नाशिक येथील सरकारी सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमध्यें दरसाल २५ कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा छापण्यांत येतात, त्यांस ३०० टन कागद लागतो. पोस्टाचीं २½ कोटि तिकिटें आणि २½ कोटि पोस्टकार्डें तेथें सालिना छापण्यांत येतात. दरसाल छापून निघणाऱ्या सर्व वस्तूंची एकूण किंमत ७ अब्ज रुपये भरते.

**सरकारी अधिकाऱ्यांस गणवेश**

इटलीमधील सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं कामावर असतांना गणवेश घातला पाहिजे, असें हुकूमशहा मुसोलिनीनें ठरविलें आहे. २८ ऑक्टोबरपासून ह्या हुकुमाची अंमलबजावणी व्हावयाची आहे. मुसोलिनीनें गणवेशांतील तपशील स्वतः तपासून त्यास मान्यता दिली आहे.

**ट्रेझरी बिलांवर ९ आ. ११ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ९ आ. ११ पै इतका पडला.

**टेनन्सी बिलास मंजुरी**

खंडकऱ्याच्या कायद्याचा मसुदा विधिमंडळांत मांडण्यास मुंबईच्या गव्हर्नरनें मंजुरी दिली आहे.

**नवीन फोर्ड मोटारी**

फोर्ड मोटार कंपनी येत्या वर्षी सहा सिलिंडरांच्या स्वस्त मोटारी विक्रीसाठी बाजारांत आणणार आहे.

**कामगारांचे पगारांत वाढ**

टेक्स्टाइल इन्क्वायरी कमिटीनें केलेल्या सूचना मुंबई प्रांतांतील बहुतेक सर्व गिरणीवाल्यांनीं मान्य केल्या असून त्याप्रमाणें त्यांनीं कामगारांचे पगारांत वाढ केली आहे, असें मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान, ना. खेर, ह्यांनीं प्रांतिक असेंब्लींत सांगितलें.

**कामगारांस नुकसान भरपाई**

वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्टाखालीं १९३७ सालीं मुंबई इलाख्यांतील एकूण ५,०७४ अपघातांबद्दल २,००,५८९ रुपये नुकसान भरपाई देवविण्यांत आली. पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टाच्या अंमलबजावणीस २८ मार्च, १९३७ रोजीं प्रारंभ झाला. त्यानंतरच्या नऊ महिन्यांच्या अवधींत थकलेल्या पगाराबाबत एकूण १८ अर्ज आले आणि त्यांतील पगार आणि नुकसान भरपाई मिळून ३,६१८ रुपयांची मागणी मान्य होऊन अर्जदारांस वरील रकम मिळाली.

**शिरगणतीस विरोध**

नवलगड येथील सुमारें चाळीस भिक्षुकांनीं एक संघ स्थापन केला आहे. ह्या संघाचा उद्देश १९४१ च्या शिरगणतीवर बहिष्कार घालणें, असा असून त्याकरितां संघानें जोरानें प्रचार करण्याचें ठरविलें आहे. शिरगणति अधार्मिक आहे व त्यामुळें अनेक अरिष्टें ओढवतात, अशी त्यांची समजूत असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रुपये किंमत |
|---|---|
| १४-८-३८ ते २०-८-३८ | २०,४४,१०२ |
| २१-८-३८ ते २७-८-३८ | ४,७१,४७५ |
| २१-९-३१ ते २७-८-३८ | ३१९,२१,७२,८६२ |

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२२ | ५ महाराष्ट्रीय तरुणांत धाडसाचा अभाव ! | ४२७ |
| २ सहकारी बँकांची परिषद् | ४२३ | ६ सहकारी चळवळ ... | ४२८ |
| ३ आर्थिक परिस्थितीचा आढावा ... | ४२४ | ७ मांडवली विमा कीं सहकारी विमा ! ... | ४२९ |
| ४ स्फुट-विचार ... | ४२५ | ८ निवडक बाजारभाव | ४३० |
| स्वदेशांतील विदेशी उद्योगधंदे–रिझर्व्ह बँका आणि शेड्यूल्ड बँका–मोटार वहातुकीचें नियंत्रण–ग्रामपंचायत कायद्यांत दुरुस्ती–सनदी नोकरांची भरती–हिंदी उमेदवारावर बंधनें. | | ९ मोटार कंपनीचा प्रचंड कारभार ... | ४३१ |
| | | १० ग्रेटब्रिटनमधील सिगारेट्सचा खप ... | ४३१ |

# अर्थ

बुधवार, ता. ३१ ऑगस्ट, १९३८

## सहकारी बँकांची परिषद्

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

ह्या प्रांतांतील सहकारी बँकांची परिषद् दर दोन-तीन वर्षांनीं भरवण्याचा आणि तीमध्यें त्यांच्यापुढें असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करण्याचा प्रघात आहे. यंदाची परिषद् मुंबई येथें गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सहकारी संस्थांची पुनर्घटना व सुधारणा कशी करावी ह्यासंबंधानें श्री. भणसाळी व श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं सरकारच्या सांगण्यावरून चौकशी केली होती. त्यांनीं केलेल्या कित्येक सूचना महत्त्वाच्या असून त्यांचे योगानें सहकारी संघटनेंत दूरगामी बदल होण्याचा संभव आहे. ह्यांपैकीं कित्येक शिफारशींसंबंधानें मुंबई सरकारानें आपले निर्णय प्रसिद्ध केले असून इतर सूचनांचा विचार चालू आहे. वरील रिपोर्टांची चर्चा करून त्याचे बाबतींत आपण कोणतें धोरण आखावें ह्यासंबंधानें विचार-विनिमय करून कार्याची दिशा निश्चित करणें सेंट्रल आणि अर्बन बँकांस आवश्यक होतें. रिझर्व्ह बँकेनें सहकारी संस्थांचे संबंधांत अनेक प्रकारची टीका आणि सूचना केल्या आहेत त्याहि विचारांत घेणें त्यांस अगत्याचें होतें. हिंदी बँकिंगच्या क्षेत्रांत मद्रासच्या बाजूस अलीकडे खळबळ उडाली आहे आणि आमच्या प्रांतांत नाशिक आणि केरा ह्या जिल्ह्यांतल्या सहकारी बँकांचे व्यवहार बंद करण्यांत आले आहेत. ही परिस्थिति चिंतनीय असल्यानें ती विचारांत घेणें सहकारी बँकांस प्राप्त होतें. ह्या बरोबरच त्यांस आपल्या नेहमीच्या व्यवहारांत भासणाऱ्या अडचणी सहविचारानें दूर करून घेण्याचें महत्त्व सहाजिकपणानेंच वाटत होतें.

प्रो. काळे ह्यांनीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांत वरील परिस्थितीचा आणि प्रश्नांचा परामर्श घेण्यांत आला हें यथोचितच झालें. बँकांनीं वेळोवेळ सहविचार करण्याची उपयुक्तता निदर्शनास आणून त्यांच्या परिषदेनें नेमलेल्या कार्यकारी समितीच्या कामाचा त्यांनीं उल्लेख केला. रिझर्व बँकेसारख्या वजनदार संस्थेनें केलेल्या टीकेचा व सूचनांचा सहकारी संस्थांनीं आदरपूर्वक परामर्श घेणें उचित असल्याचें सांगून अलीकडे दुरुस्त झालेल्या कंपनी कायद्यांतल्या कांहीं उपयुक्त बाबी इष्ट दिसल्यास त्यांनीं त्या उचलाव्या असें त्यांनीं सुचवलें. मुंबई प्रांतांतल्या मध्यवर्ती सहकारी बँकांची व्यवस्था व स्थिति चांगली असल्याचें सरकारनें जाहीर केलें आहे, त्याविषयीं समाधान व्यक्त करून नाशीक व केरा बँका बंद करण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली ह्याची माहिती सरकारनें प्रसिद्ध केली असती तर तीवरून योग्य तो बोध घेण्याची संधी सर्व सहकारी कार्यकर्त्यांस मिळाली असती असा अभिप्राय त्यांनीं प्रकट केला. दोन जिल्हा बँकांचा कारभार बिघडला ह्याबद्दल सहकारी प्रातिनिधिक संस्थांस पत्ताहि असूं नये आणि त्या प्रश्नाचे बाबतींत सर्व काळजी सरकारनें वहावी ह्यावरून लोकांचे सहकारी संघटन किती दुर्बल आहे ह्याची चांगली कल्पना येते. बँकांनीं ह्यासंबंधांत सामुदायिक रीत्या आपली जबाबदारी ओळखली पाहिजे असा सल्ला प्रो. काळे ह्यांनीं दिला.

सहकारी संस्थांचीं येणें असलेलीं कर्जें आर्थिक मंदीमुळें गोंधळांत पडलीं असून त्यांच्या वसुलीचा आणि संस्थांचा कारभार चालू राहण्याचा प्रश्न अत्यंत बिकट होऊन बसला आहे. अशा परिस्थितींत बँका व सोसायट्या आणि सोसायट्या व त्यांचे सभासद ह्यांच्या परस्पर-संबंधांविषयीं सहकारी कार्यकर्त्यांच्या मनांत गैर-समज असावा ह्याबाबत प्रो. काळे ह्यांनीं खेद व्यक्त केला. सहकारी बँका आणि पेढ्या नफेबाजी करणाऱ्या संस्था नसून समाजसेवा हें त्यांचें ध्येय व कार्य आहे ही गोष्ट लक्षांत न घेतां कित्येक लोक त्यांस सावकारांच्या जोडीस नेऊन बसवतात हें दुर्दैव आहे. देण्याघेण्यांचे संबंधांत होणाऱ्या कायद्यांत सहकारी संस्थांची विशिष्ट घटना व कार्यपद्धति ध्यानांत ठेवली पाहिजे असा त्यांनीं इशारा दिला. सहकारी संस्थांचीं नाठाळ कुळें कर्जफेड करण्याचें टाळतात त्यांवर सक्तीची उपाययोजना केली जाईल असें मुंबई सरकारनें जाहीर केल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. नंतर त्यांनीं पतपेढ्यांच्या देखरेखीच्या प्रचलित पद्धतीवर टीका केली. ही व्यवस्था फाजील खर्चाची आहे, गुंतागुंतीची आहे आणि तिचा व्हावा तसा उपयोग होत नसल्यानें तिची पुनर्घटना करण्याची अवश्यकता आहे असें त्यांनीं प्रतिपादिलें. मध्यवर्ती आणि अर्बन बँका ह्यांचें संघटनात्मक आणि सांपत्तिक बळ एवढें मोठें आहे कीं त्यांनीं एकजुटीनें मनांत आणल्यास किती तरी विधायक कार्य करतां येण्यासारखें आहे. आपला कार्यक्रम विचारानें आखून तो पुरा करण्याचें त्यांनीं ठरवलें पाहिजे. आत्मविश्वास, ध्येयावरील श्रद्धा आणि अविरत प्रयत्न ह्यांच्या सहायानें सहकारी कार्यकर्त्यांनीं आपलें काम चालविल्यास त्यांस यश आल्यावांचून रहाणार नाहीं असें मत प्रकट करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण संपवलें.

---

### हिंद-ब्रिटन व्यापारी करार

हिंद-ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटींत हिंदुस्थान सरकारास सहाय करणाऱ्या बिनसरकारी सल्लागार मंडळाचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, हे लँकेशायरनें सुचविलेल्या तडजोडीच्या मसुद्याबाबत मुंबई येथील गिरणीवाल्यांशीं चर्चा करीत आहेत. व्यापारी कराराचीं बोलणीं यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत.

## आर्थिक परिस्थितीचा आढावा

### उतरते बाजारभाव—बँकिंगची प्रगति

इंपीरिअल बँक ऑफ इंडियाच्या भागीदारांची १८ वी वार्षिक साधारण सभा मद्रास येथें मागें होती, त्यावेळीं अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत गेल्या वर्षातील आर्थिक परिस्थितीचा तपशीलवार आढावा घेतला. त्यांतील प्रमुख मुद्यांचा उल्लेख खालीं करण्यांत आला आहे.

( १ ) जागतिक व्यापाराचे दृष्टीनें गेलें वर्ष निराशाजनकच होतें. युद्धसामुग्रीच्या उत्पादनांत वाढ झाली तरी एकूण व्यापार मंदीचाच राहिला.

( २ ) गेल्या फेब्रुवारींत विमानांचे मार्गानें स्वस्त दरांत सर्व टपाल जाण्या-येण्याची सोय झाली, ही व्यापारी वर्गाचे दृष्टीनें एक महत्वाची सुधारणा झाली.

( ३ ) दक्षिण हिंदुस्थानांतील बँकिंगचे क्षेत्रांत तेथील एक शेड्यूल्ड बँक बंद पडल्यामुळें संकट उपस्थित झालें, परंतु रिझर्व्ह बँकेने आणि मद्रासच्या मुख्य प्रधानांनीं वेळींच पत्रकें प्रसिद्ध करून लोकांचा विश्वास प्रस्थापित केला.

( ४ ) जगांतील इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांतहि बाजारभाव पडून राहिले, इतकेंच नव्हे तर कांहीं पिकांचे किंमतींत आणखी घट झाली. कपाशीच्या भावांतील उतार विशेष उल्लेखनीय आहे. १९३५-३६ मध्यें भडोच कपाशीचा भाव प्रत्येक खंडीस २१९ रु. १४ आ. होता, तो १९३६-३७ सालीं २२७ रु. झाला; परंतु गेल्या वर्षी तो १६६ रुपयांपर्यंत खाली उतरला.

( ५ ) साखरेच्या भावांत थोडीशी सुधारणा झाली. तिचा भाव मणास ६ रुपये होता तो गेल्या वर्षी वाढून ७ रु. ६ आ. झाला.

( ६ ) मालाचा शिलकी साठा पडून असूनहि तागाच्या गिरण्यांतील उत्पादन चालू आहे. मजुरांमधील असमाधान हेंहि तागाच्या गिरण्यांच्या दुरावस्थेचें एक कारण आहे.

( ७ ) जपानी कापडाची स्पर्धा कमी झाल्यामुळें हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांस बरे दिवस आले आहेत. मुंबई प्रांतिक सरकारनें नेमलेल्या कमिटीनें सुचविलेल्या पगारवाढीचा कारखान्यांवर काय परिणाम होतो, हें अद्याप कळावयाचें आहे.

( ८ ) लोखंड आणि पोलाद ह्यांचे धंद्यास तेजी होती, परंतु कोळशाच्या भावांत पुनः उतार झाला आहे.

( ९ ) सरकारी रोख्यांच्या किंमतींत विशेष चढउतार नाहीं, परंतु त्यांच्या किंमतीचा रोख वाढीकडे असल्याचें दिसतें. जून, १९३७ अखेर ३½ टक्क्यांच्या रोख्याची किंमत ९४ रु. १० आ. होती, ती जून, १९३८ अखेर ९८ रु. ८ आ. झाली. उत्पादक मंडळ्यांच्या भागांचे किंमतीवर जागतिक उलाढालींचा परिणाम होणें अपरिहार्यच होतें. तथापि, त्यांच्या भागांचे खाली गेलेले बाजारभाव पुनः सुधारूं लागले आहेत.

(१०) मालाच्या किंमतींत उतार झाला, तरी उद्योगधंद्यांस आणि व्यापारास बँकांकडून वाढत्या प्रमाणांत मदत झाली. शेड्यूल्ड बँकांनीं डिस्कौंट केलेल्या हुंड्यांतहि समाधानकारक वाढ झाली.

( ११ ) शेड्यूल्ड बँकांकडे गेल्या वर्षाचे पहिल्या सहामाहींत सरासरीनें २४३ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या. दुसऱ्या सहामाहींत हा आकडा २३५ कोटि झाला. रिझर्व्ह बँकेचा आणि इंपीरिअल बँकेचा "बँक रेट" ३ टक्के कायम राहिला.

( १२ ) ट्रेझरी बिलांवर सरासरीनें १ रु. १ आ. २ पै व्याजाचा दर पडला. १९३७ च्या दुसऱ्या सहामाहींतील दराची सरासरी १२ आ. ४ पै आणि १९३८ च्या पहिल्या सहामाहींतील दराची सरासरी १ रु. ६ आ. ६ पै अशी होती.

( १३ ) वझिरिस्तानांतील हालचालींमुळें लष्करी खर्चांत १¾ कोटि रुपयांची वाढ झाली तरी मध्यवर्ती सरकारच्या बजेटांत तूट आली नाहीं. निर्गत व्यापारांत फार मोठी घट झाली आणि त्याबरोबरच आयातहि वाढली, ह्यामुळें हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति चिंताजनक झाली आहे. ह्याचा परिणाम हुंडणावळीवर झाल्यावाचून राहिला नाहीं, परंतु आतां पुनः परिस्थिति निवळलेली दिसते.

( १४ ) इंपीरिअल बँकेस अहवालाचे वर्षी त्या पूर्वीच्या सालापेक्षा ५½ लक्ष रु. ज्यास्त नफा झाला आहे.

---


## बार्शी कोऑपरेटिव्ह बँक लि.

(स्थापना १९०६)

## नोटिस

बँकेच्या सर्व मेंबरांस कळविण्यांत येतें कीं, बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा तारीख २५ सप्टेंबर, १९३८ रविवार रोजीं दुपारीं ( ३ ) वाजतां बार्शी येथें बँकेचे ऑफिसमध्यें खालील विषयांचा विचार करण्याकरतां भरेल, तरी त्यावेळीं सर्व मेंबरांनीं हजर रहावें अशी विनंती आहे.

( १ ) ता. ३०-६-३८ अखेरचे हिशोब व मॅनेजिंग बोर्डानीं केलेला रिपोर्ट मंजूर करणें;

( २ ) शेअरवर देण्याचा डिव्हिडंडचा दर ठरविणें.

( ३ ) बँकेच्या पोट नियम २७(३) यांस अनुसरून चालू सालीं रिटायर झालेल्या डायरेक्टरांचे जागीं नवीन निवडणूक करणें.

व्यक्तिशः सभासदांतर्फे डायरेक्टरांपैकीं श्री. जी. आर. काळे हे व सोसायट्यांतर्फे डायरेक्टरांपैकीं श्री. डी.बी.कासीद हे रिटायर्ड होत आहेत.

( ४ ) नोटिस बोर्डावर लावलेल्या यादीप्रमाणें पोट नियम दुरुस्त करणें.

( ५ ) व्यक्तिमात्र सभासदांस रु. ३००० पर्यंत कर्ज मिळणेचे अर्ज मंजूर करणें.

सदर अर्ज साधारण सभेपूर्वी निदान एक दिवस अगोदर दिले पाहिजेत.

( ६ ) सन १९३८-३९ सालामध्यें बँकेनें उभारावयाच्या भांडवलाची मर्यादा ठरवणें.

( ७ ) चेअरमन यांचे परवानगीनें आयतेवेळीं येणारीं दुसरीं कामें.

बार्शी — बोर्डाचे हुकुमावरून

ता. २४-८-३८ — र. प. पटवर्धन

मॅनेजर.

---

## पुणें मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.

### या बँकेंत खालीलप्रमाणें ठेवी स्वीकारल्या जातात

| | | |
|---|---|---|
| चालूं ठेव | | द. द. शे. १ टक्का. |
| सेव्हिंग्ज ठेव. | | द. द. २½ " |
| कायम ठेव | मुदत १ वर्षे | द. द. ३¼ " |
| " | " २ " | द. द. ३¾ " |
| " | " ३ " | द. द. ४¼ " |
| " | " ५ " | द. द. ४½ " |

ग. म. नलावडे,

चेअरमन.

# स्फुट विचार

## स्वदेशांतील विदेशी उद्योगधंदे

असोसिएशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजचे मावळते अध्यक्ष, श्री. गोवर्धनदास मुरारजी, ह्यांनीं असोसिएशनच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं भाषण केलें, त्यांत त्यांनीं हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या आणि होत असलेल्या विदेशी कारखान्यांचा उल्लेख केला आणि हिंदी संरक्षणात्मक जकातींचा फायदा त्यांस मिळून शुद्ध स्वदेशी कारखान्यांस अनिष्ट स्पर्धा सहन करावी लागते, असें त्यांनीं सांगितलें. रबरी टायर्स, साबण, सिगारेट्स इत्यादि प्रकारच्या मालाचे अनेक विदेशी कारखाने हिंदुस्थानांत आपलें स्थान दृढ करीत आहेत. भांडवलाचा मोठा पुरवठा, तज्ज्ञांच्या सहायाची सुलभता आणि व्यावहारिक दीर्घकालिन अनुभव ह्यांच्या योगानें ह्या विदेशी कारखान्यांची चलती होत आहे. हिंदी उद्योगधंद्यांस संरक्षण मिळावें ह्याकरितां बसविलेल्या संरक्षक जकातींचा पुरेपूर फायदा वरील कारखान्यांस मिळत असून, बाल्यावस्थेंतील हिंदी उद्योगधंद्यांची त्यामुळें गळचेपी होत आहे. हिंदी घटना कायद्यामधील ह्याबाबत योजना अत्यंत असमाधानकारक आहे; कारण मध्यवर्ती अगर प्रांतिक सरकारांनीं ह्या अंतर्गत विदेशी स्पर्धेस आळा घालणें आतां बेकायदा झालें आहे. नवीन राज्यघटनेमधील व्यापारविषयक आर्थिक संरक्षक बंधनें हिंदी उद्योगधंद्यांस बाधक आहेत, ह्याबद्दल कोणासच संशय नाहीं. विदेशी कारखानदारांनीं हिंदी बाजारपेठ काबीज केली, तरी त्यास आळा घालावयाचा नाहीं आणि हिंदी उद्योगधंद्यांस दिलेल्या संरक्षणाचा फायदा मात्र त्यांस मिळूं द्यावयाचा, अशी विचित्र परिस्थिति घटना कायद्यानें निर्माण केली आहे. जगांतील इतर सर्व राष्ट्रांस असलेला स्वतःच्या हितसंरक्षणाचा स्वाभाविक अधिकार हिंदी राष्ट्रास नाहीं. आर्थिक उन्नति झाल्याविना हिंदुस्थानाची प्रगति कशी होणार? आणि देशी उद्योगधंद्यांस सहाय करून आणि त्यांचें परकी स्पर्धेपासून रक्षण करून त्यांची जोपासना केल्याखेरीज आर्थिक परिस्थिति कशी सुधारणार? परराष्ट्रीय व्यापार, संरक्षक जकाती, हुंडणावळ, इत्यादि बाबींचा विचार राष्ट्रीय दृष्टीनें होऊन इष्ट ती उपाय योजना करण्याचा अधिकार हिंदी लोकप्रतिनिधींच्या हातीं जर आला नाहीं, तर केवळ घटना राबविण्यानें देशाचें विशेष हित साधण्याचा संभव नाहीं.

---

## रिझर्व्ह बँक आणि शेड्यूल्ड बँका

त्रावणकोर नॅशनल अ‍ॅन्ड क्विलॉन बँक बंद पडण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेनें तिला सावरण्याचे कोणकोणते प्रयत्न केले, रिझर्व्ह बँक आणि शेड्यूल्ड बँका ह्यांचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे आहेत, अडचणींत सापडलेल्या शेड्यूल्ड बँकेस सहाय करण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर कितपत आहे, सध्याचा रिझर्व्ह बँकेबाबत कायदा अशी मदत देण्याचे मार्गांत येत आहे काय, इत्यादि अनेक प्रश्नांविषयीं जनतेमध्यें कुतूहल निर्माण झालें आहे. ह्या सर्व प्रश्नांस सर्वसाधारण उत्तर देऊन रिझर्व्ह बँकेची भूमिका शक्य तेवढी स्पष्ट करण्याचा प्रयत्न मध्यवर्ती असेंब्लींत फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांनीं केला. रिझर्व्ह बँक आणि हिंदुस्थान सरकार ह्यांमधील पत्रव्यवहार गुप्त स्वरूपाचा असतो, त्यामुळें, आणि त्रावणकोर बँकेचें प्रकरण कोर्टापुढें असल्यामुळें, आपणांस फार खोलांत आणि तपशिलांत शिरतां येत नाहीं, असा खुलास सर जेम्स ह्यांनीं प्रारंभींच करून टाकला. त्रावणकोर बँक बंद पडली तरी त्याचा अनिष्ट परिणाम इतर बँकांवर होऊं नये, ह्यासाठी विश्वास निर्माण करण्याकरितां रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर हे मद्रास येथें समक्ष गेले. बँकिंगची एकंदर परिस्थिति समाधानकारक असल्याविषयीं रिझर्व्ह बँकेनें एक पत्रक काढलें आणि मद्रास हायकोर्टाचे परवानगीनें तिनें त्रावणकोर बँकेसंबंधीं चौकशी करण्याचें काम स्वीकारलें. अनेक शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे मदत मागितली, आणि तिनें आवश्यक ती मदत दिली. चांगल्या तऱ्हेनें चालणाऱ्या बँकांस सहाय करण्याचा तिला कायद्यानें दिलेला अधिकार पुरेसा असून प्रस्तुत प्रकरणांत तिनें शक्य ती मदत केली, असें सर जेम्स ह्यांनीं सांगितलें. जरूर प्रसंगीं शेड्यूल्ड बँकांचे मदतीस रिझर्व्ह बँकेस जातां येणें, त्या बँकेस शेड्यूल्ड बँकांनीं विश्वासांत घेऊन तिला आपली परिस्थिति स्पष्टपणें आणि नियमितपणें सांगण्यावर अवलंबून आहे, असें त्यांनीं जाहीर केलें. बँकेचे सध्याचे अधिकार आज तिला पुरेसे वाटत आहेत; तथापि त्यासंबंधांत पुनः पुरी चौकशी करीत असून शेड्यूल्ड बँकांचें मतहि ती मागविणार आहे आणि जादा अधिकार आवश्यक वाटल्यास, बँक त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारास कळवील, असें त्यांनीं सांगितलें. सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत ज्यास्त तपशीलवार खुलासा करणें योग्य झालें नसतें, हें खरें असलें तरी लोकांची अपेक्षा वरील माहितीनें पुरी होणें कठीण आहे.

---

## मोटार वहातुकीचें नियंत्रण

मोटार वहातुकीचें नियंत्रण करणाऱ्या बिलावरील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट सरकारच्या वहातुक मंत्र्यांनीं असेंब्लीस सादर केला. मोटारींची वहातुक हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं आतां अत्यंत आवश्यकतेची बाब झालेली असून त्यामुळें अंतर्गत दळणवळण वाढण्यास अतिशय सहाय मिळालेलें आहे. मोटारींची रेलवेजशीं स्पर्धा होणें सहाजीकच होतें. ह्या स्पर्धेचा परिणाम रेलवेजचें उत्पन्न कमी होण्यांत झाला आहे. मोटारींच्या वहातुकीचा धंदा सुव्यवस्थित आणि सुनियंत्रित व्हावा आणि मोटारींतून प्रवास करणारांच्या सुखसोईकडे दुर्लक्ष होऊं नये, ह्या हेतूनें योजना आखण्यांत हिंदुस्थान सरकारनें तत्परतेनें पुढाकार घेतला ह्याचे मुळाशीं रेल्वेज आणि मोटारी ह्यांमधील स्पर्धेमुळें रेल्वेजच्या उत्पन्नांत तूट येऊन सरकारास सालोसाल नुकसान सोसावें लागत आहे, हें चालना देणारें प्रमुख कारण आहे. मोटार वहातुकीच्या धंद्याची गळचेपी न होतां त्याची चांगली संघटना व्हावी ह्या दृष्टीनें मोटार वहातुक नियंत्रण बिलानें अनेक योजना आखल्या आहेत. मोटार वहातुकीसंबंधांतील प्रांतानिहाय कायद्यांत आणि नियमांत एकसूत्रीपणा आणण्याचाहि बिलाचा उद्देश आहे. उतारूंस अगर रस्त्यावरून जाणाऱ्या पादचारी लोकांस भाड्याच्या मोटारींपासून इजा अगर दुखापत पोंचल्यास पुरेपुर नुकसानभरपाई हमखास मिळण्याची सध्या सोय नाहीं; परंतु सक्तीच्या विम्याचे योजनेमुळें ती उपलब्ध होणार आहे. उतारूंच्या आणि पादचारी लोकांच्या दृष्टीनें ही सुधारणा अत्यंत महत्त्वाची आहे. मोटारींचे अपघात टाळण्यास आणि अपघातामुळें होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्यास प्रस्तुत योजनेची अतिशय मदत होणार आहे.

---

### ग्रामपंचायत कायद्यांत दुरुस्ती

मुंबई प्रांतांतील खेड्यांमध्यें पंचायतींची स्थापना करून स्थानिक स्वराज्याच्या स्थापनेस शक्य तें सहाय देण्याच्या उद्देशानें मुंबई सरकारनें एक बिल असेंब्लीपुढें आणलें आहे. सन १९३३ च्या पंचायत ॲक्टांत आवश्यक ती दुरुस्ती करून पंचायतींचे अधिकार वाढविण्याची ह्या बिलानें तरतूद केली आहे. दोन हजार किंवा त्यापेक्षा जास्त वस्ती असलेल्या ठिकाणीं पंचायतींची स्थापना आतां सक्तीनें होणार असून त्यापेक्षा कमी वस्तीच्या गांवीं पंचायती स्थापण्याचाहि सरकारास अधिकार रहाणार आहे. पंचायतींचे सर्व सभासद लोकनियुक्त असावयाचे असून अल्पसंख्याकांस त्यांचे वस्तीचे प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळावयाचें आहे. पंचायतींनीं निवडलेल्या पांच जणांच्या बेंचास कांहीं मर्यादेपर्यंतचे दावे चालविण्याचा अधिकार देण्याचा सरकारचा विचार आहे. २५ रुपयांपर्यंतच्या दाव्यांबाबत त्यांस न्यायनिवाडा करतां येईल आणि १० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देतां येईल, अशी योजना आहे. सध्याच्या कायद्यान्वयें पंचायतींच्या सेक्रेटरीची नेमणूक पंचायतीच करतात. ही नेमणूक सरकारनें करावी, अशी दुरुस्ती प्रस्तुत बिलानें केली आहे, मुंबई इलाख्यांतील २१,८४० खेडेगांवांपैकीं सध्या ४४० गांवांत पंचायती आहेत. बिलाचें रूपांतर कायद्यांत झाल्यानंतर, पंचायतींची संख्या झपाट्यानें वाढून नागरिकत्वाचें शिक्षण सर्व जनतेस मिळण्यास सहाय होईल. स्थानिक स्वराज्याचा पाया त्यामुळें दृढ होऊन सर्वसाधारण सामाजिक व राजकीय प्रगतीचें पाऊल पुढें पडण्यासहि मदत होईल.

---

### सनदी नोकरांची भरती—हिंदी उमेदवारांवर बंधनें

सन १८३३ च्या पार्लमेंटच्या कायद्यानें ईस्ट इंडिया कंपनीचे नोकरींतील सर्व जागीं हिंदी लोकांस नेमण्यास परवानगी दिली. सन १८५८ च्या कायद्यानें नेमणुकीपूर्वी परीक्षा घेण्याबाबत तजवीज केली. सन १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानें सरकारी नोकरी सर्व प्रजाजनांस खुली असल्याचें जाहीर केलें. हिंदुस्थानांत आणि इंग्लंडमध्यें एकदमच दोन परीक्षा घेण्यांत याव्या आणि त्यांत उत्तीर्ण होणारांचा एकाच यादींत समावेश करावा, असें भारतमंत्र्यांनीं नेमलेल्या एका कमिटीनें १८६० सालीं सुचविलें. कॉमन्स सभेनें एक ठराव करून ह्या सूचनेस मान्यता दिली. तथापि, तो ठराव अनेक वर्षे तसाच दप्तरांत पडून राहिला. अखेर सुमारें ११ वर्षांपूर्वी त्याची थोड्याफार स्वरूपांत अंमलबजावणी होण्यास प्रारंभ झाला. परंतु स्पर्धा ज्यास्त खुली करण्याऐवजीं इंग्लंडमधील चढाओढीच्या परीक्षांस हिंदी विद्यार्थ्यांस बसणें अशक्य करण्याचें धोरण ब्रिटिश सरकारनें आतां अंगिकारलें आहे. इंग्लंडमधील किमान वास्तव्याची आणि विशिष्ट विश्वविद्यालयीन पदवीची अट हिंदी विद्यार्थ्यांस जाचक होत आहे. मुंबई विश्वविद्यालयानें ह्या प्रश्नाबाबत भारतमंत्र्याकडे गाऱ्हाणें मांडून हिंदी विद्यार्थ्यांस होणाऱ्या अन्यायाचें दिग्दर्शन केलें होतें. तथापि त्या संबंधांतील अटी दूर करण्यास भारतमंत्रि तयार नसल्याचें मुंबई विश्वविद्यालयास लिहून आलें आहे. ह्यावरून १८६० सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें स्वीकारलेलें धोरण आतांच्या धोरणापेक्षां कितीतरी ज्यास्त दिलदार होतें तें दिसून येईल, आणि सरकारी नोकरींतील हिंदी उच्च अधिकाऱ्यांच्या नेमणुकीविषयीं ब्रिटिश सरकारची अनुदारता स्पष्ट होईल.

---


**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

**" URBAN BANKS "**

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

**शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या**
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या
**ठेवी घेणें आहेत**
व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम कितीं व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.
**आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.**

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
**द. म. द. शें. ॥४चार आणे व्याजानें**
व
**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**
देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ॥२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

## महाराष्ट्रीय तरुणांत धाडसाचा अभाव ?

( ले.:—श्री. अ. ह. लिमये, एम्. ए. )

हिंदी तरुणांत परदेशी जाण्याचें धाडस अजून निर्माण होत नाहीं, आपल्या प्रांताच्या बाहेर जाण्यास ते तयार नसतात, असा आरोप बरेच वेळां सध्याच्या तरुण पिढीवर आणि सामान्यतः महाराष्ट्रीयांवर करण्यांत येतो. हा आरोप थोड्या-बहुत प्रमाणांत जरी खरा आहे असें वाटत असलें तरी या प्रश्नाची पार्श्वभूमि आणि परदेशगमनाबाबत येणाऱ्या अडचणी यांचा विचार होणें जरूर आहे.

संस्कृतीचें दडपण हें या परिस्थितीचें पहिलें कारण आहे असें थोडासा विचार करतां आढळून येतें. महाराष्ट्रीय पांढरपेशा समाज हा जात्याच अल्पसंतुष्ट असतो. आपलें शिक्षण संपवावें, सरकारी अथवा अन्य नौकरी करावी आणि मिळेल तेवढ्या प्राप्तीवर समाधान मानून आपलें आयुष्य घालवावें अशी आज अनेक वर्षांची महाराष्ट्राला शिकवण मिळत आलेली आहे. या प्रवृत्ती-मुळें धडाडी, साहस, वगैरे गुणांची जोपासनाच होत नाहीं. गुज-राथी लोकांत धाडसाची आवड ही एक प्रकारची वंशपरंपरा देणगीच असते. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी लोटा घेऊन देशांतर करणारे मारवाडी आपण पाहातों आणि आपल्याच आळींत दुकान काढून थोड्याच दिवसांत संपन्नतेस पोहोंचल्या-चेंहि दृश्य आपणांस पाहतां येतें. ही प्रवृत्ति महाराष्ट्रीयांत आजवर दिसून आली नाहीं. याचें कारण गेली पिढी अथवा तिच्या मागच्या पिढ्या यांना नौकऱ्या मिळविणें हें सहजसाध्य असल्यानें मुलांनीं हा 'राजमार्ग' सोडून व्यापार-धंद्यासारख्या 'आड-मार्गांत' शिरावें अशी कल्पनाहि त्यांच्या मनास शिवली नाहीं. इतकेंच नव्हे तर सुशिक्षित तरुणांनीं महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन एखादें छोटेसें दुकान काढावें, व त्याचें कौतुक होण्या-ऐवजी हेटाळणी व्हावी अशींहि उदाहरणें प्रस्तुत लेखकास माहीत आहेत. या बाबतची आणखी एक अडचण म्हणजे विवाहासंबंधींची. आपलें नशीब काढण्यासाठी आफ्रिका वगैरे देशांत गेलेल्या लोकांस महाराष्ट्रांत मुली मिळूं नयेत हें कशाचें द्योतक आहे ? युरोपियन लोक जगाच्या पाठीवर कोठेंहि जाण्यास तयार असतात. हिंदुस्थानांतील बादशाही नौकरींतून निवृत्त झाल्यावर येथील इंग्रज अधिकारी स्वदेशांत जाण्याच्या भानगडींत न पडतां आफ्रिका, ऑस्ट्रेलिया वगैरे देशांत जाऊन तेथें वसाहती स्थापतात व स्थाईक होतात. महाराष्ट्रीयांनीं ह्या गोष्टी ध्यानांत ठेवणें जरूर नाहीं काय ? पुण्यांतील इसम रत्नागिरी अथवा बेळगांव इतक्या जवळच्या गांवींहि जाण्यास तयार नसतो हें कशाचें द्योतक आहे !

याच बाबतींतील आणखी एक मुद्दा म्हणजे सरकारी सहा-याचा. युरोपांतील राष्ट्रें आपापल्या देशांतील उद्योगधंद्यांचा प्रसार परदेशीं व्हावा या हेतूनें प्रचारक परदेशीं पाठवीत असतात. 'टूरिस्ट बिझिनेस' हा पाश्चात्य देशांत दिवसें-दिवस अधिकाधिक फैलावत आहे. प्रदर्शनें भरविणें, ऑलेंपिक सामने करणें, आपल्या देशांतील सृष्टिसौंदर्याची पर-देशांत स्तुति करणें व परदेशांतील लोकांस आपल्या देशांत पाहुणे म्हणून बोलाविणें वगैरे मार्गांनीं पाश्चात्य देश प्रचार करीत असतात. ऑस्ट्रियन सरकारचे एक प्रचारक डॉ. हरमान औवार्ट हे नुकतेच हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचा प्रचार करून गेले हें सर्वांस माहितच आहे. याशिवाय क्रप, आगफा वगैरे जगप्रसिद्ध कार-खान्यांचे प्रचारक आपापल्या देशांतून हिंदुस्थानांत येऊन पुणें, सातारा, कोल्हापूर वगैरे सारख्या शहरांतहि फिरतात, स्थानिक भाषेंत आपापल्या कारखान्यांची माहिती छापतात व प्रचार करतात. अशा प्रकारची सुसंघटित व सुव्यवस्थित प्रचारपद्धति आपल्याकडे नाहीं. हा काय महाराष्ट्रीयांचा दोष समजावयाचा ? महाराष्ट्रांत व्यापारधंद्यांस अजून कोठें सुरवात होत आहे. व्यापारधंद्यांच्या या बाल्यावस्थेंत परदेशी आपापले प्रचारक पाठविणें शक्य होणार नाहीं, हें जरी खरें असलें तरी अशा वेळीं कारखानदारांनीं आपली एकजूट करून एखाद्या संघातर्फे सामुदायिक रीत्या माल पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. नुकतींच पॅरिस व ग्लासगो येथें जीं जागतिक प्रदर्शनें भरलीं होतीं तेथें हिंदुस्थानच्या वांट्याला अगदी लहान लहान खोल्या आल्या होत्या, व बनारसच्या पितळी मालाखेरीज आकर्षक अशा वस्तु तेथें फारच थोड्या होत्या. या दृष्टीनें परदेशांत हिन्दी मालाचा प्रसार व प्रचार करण्यासाठीं हिन्दी कारखानदारांनीं व सरकारनें तरुणांना उत्तेजन दिलें तर हिंदी तरुण मागें घेतील असें आम्हांस मुळीच वाटत नाहीं. या बाबत परदेशीं जाण्यास हिंदी अथवा महाराष्ट्रीय तरुण तयार नाहींत हें म्हणणें बरोबर नसून त्यांना या बाबतींत वावच नाहीं हेंच खरें आहे. याबाबत प्रस्तुत लेखक व त्याचे दोन स्नेही श्री. रा. गो. नातू व श्री. स. कृ. पाध्ये यांनीं खटपट केली आहे व अजून आम्हीं खटपट करीत आहों. दक्षिण आफ्रिका, नेपाळ, अमेरिका, चीन वगैरे देशांतील ठिकठिकाणच्या आमच्या सोब-त्यांना व इतर ओळखीच्या गृहस्थांना आम्हीं पत्रें लिहून पाहिलीं परंतु प्रत्येक ठिकाणच्या प्रांताभिमानामुळें आणि परकीय'वरील निर्बंधांमुळें तेथें आम्हांस प्रवेश मिळूं शकला नाहीं. आमच्या प्रमाणेंच आज शेकडों लोक परदेशी जाण्याची खटपट करीत आहेत. परंतु त्यांना अजून यश आलें नाहीं. याचें कारण पर-देशीं जाण्याची त्यांची तयारी नाहीं हें नसून त्यांना वाव मिळत नाहीं हेंच आहे. परदेशी जाण्यास लागणारा पैसा, तेथें ठेवावी लागणारी अनामत रकम, तेथें होणारी अवहेलना, या अडचणी दुर्लंघ्य आहेत. अशा वेळीं कारखानदार व परदेशगमनोत्सुक महाराष्ट्रीय तरुण यांचा एखादा संघ स्थापन झाला तरच अंधपंगुन्याया-प्रमाणें दोघांचेंहि काम होऊन उद्योगधंद्याचा हा गाडा पुढें रेटला जाईल.

---

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशां-साठीं भोजनाचें व उतर-ण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## सहकारी चळवळ

### पुणें सेंट्रल को. बँक, लि.

( वार्षिक सभा: ४-९-३८ )

वरील बँकेचें भाग भांडवल ३,७०,८६० रुपये असून तिचेकडील ठेवींची रक्कम सुमारें ४३½ लक्ष रुपये आहे. गंगाजळी ठेव १,१४,८६० रुपये आणि इतर फंड्स, नफ्याची शिल्लक वगैरे मिळून ३,०२,१३० रुपये आहेत. बँकेचें एकूण खेळतें भांडवल सुमारें ५१½ लक्ष रुपये आहे. बँकेचे १४½ लक्ष रुपये सोसायट्यांकडे येणें आहेत, ४½ लक्ष रुपये इंडियन ट्रस्ट ॲक्टान्वयें गुंतविण्यांत आले आहेत आणि २६ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत आहेत. भांडवलाशीं खर्चाचें प्रमाण शेकडा १·१ इतकें पडतें. जुन्नर, सासवड, खेड, इंदापूर, दौंड व डेक्कन जिमखाना या ठिकाणीं बँकेच्या शाखा आणि फर्ग्युसन कॉलेज व ओगलेवाडी येथें उपशाखा आहेत. ठेवींपैकीं सुमारें ११ लक्ष रुपये सार्वजनिक संस्था व सहकारी सोसायट्या ह्यांचे आहेत. बाकी राहिलेल्या ३२ लक्ष रुपयांपैकीं पुणें शहरांतील ठेवींची रक्कम २५½ लक्ष रुपये भरते. बँकेस जोडलेल्या शेतकी सोसायट्यांची वर्गवारी बँकेच्या अहवालांत दिली आहे, त्यावरून अ आणि ब वर्गांतील सोसायट्यांची संख्या कमी होत चालली असून क आणि ड वर्गांतील सोसायट्या वाढत आहेत, असें दिसतें. सोसायट्यांच्या कर्जावरील व्याजाचा दर १-७-३७ पासून द. सा. द. शे. ७ टक्क्यांपासून ६½ टक्क्यांपर्यंत उतरविण्यांत आला आहे. जादा रिबेटच्या योजनेनुसार अहवालाचे वर्षीं ६६ सोसायट्यांना १,५१९ रु. रिबेट मिळालें. बँकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा नवीन उपक्रम सुरू केला असून त्यापासून आणि सेफ कस्टडीचे व्यवहारापासून अहवालाचे सालीं बँकेस सुमारें ९०० रुपये भाडें मिळालें. १९३७-३८ अखेर बँकेस ३६,८८३ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी २२ हजार रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. गंगाजळींत ९½ हजार रुपये, बुडीत आणि संशयित कर्ज फंडांत १,८८४ रुपये आणि बोनस फंडांत ३ हजार रुपये टाकावे, असेंहि त्यांनीं सुचविलें आहे. वरील वृत्तांतावरून पुणें सेंट्रल को. बँकेची सर्व बाजूंनीं मजबूत पायावर समाधानकारक प्रगति होत असल्याचें दिसून येतें.

---

### दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

( वार्षिक सभा: ११-९-३८ )

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ४७२ असून भाग भांडवल १६,६५० रुपये आहे. ठेवी ५४½ हजार रुपयांच्या आहेत. सभासदांकडून ५७½ हजार रुपये येणें आहेत. मागील सालीं थकबाकीचें प्रमाण शेकडा २४·१ होतें, तें अहवालाचे वर्षीं १५·५ वर आलें, ही समाधानाची गोष्ट आहे. बँकेच्या खर्चाचें तिच्या खेळत्या भांडवलशीं प्रमाण शेकडा २·१ पडतें. धान्याचे व सोन्याचांदीचे तारणावर कर्जें मंजूर करण्याबाबतचे नियम रजिस्ट्रारकडून मान्यता मिळून आले म्हणजे बँकेच्या व्यवहारांत वाढ होऊन तिचें उत्पन्नहि वाढेल, अशी अपेक्षा आहे. वर्षअखेर बँकेस २,९१० रु. ६ आ. नफा झाला, त्यांतून भागीदारांस द. सा. द. शे. ६½ टक्के दरानें डिव्हिडंड यावें, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे.

---

### इंदूर परस्पर सहकारी पेढी मर्यादित, इंदूर

वरील पेढीचें भरणा झालेलें भांडवल ९८,९८१ रुपये असून तिच्या गंगाजळींत आणि इतर रिझर्व्हज्‌मध्यें मिळून सुमारें ७३ हजार रुपये आहेत. तिचेकडे ७ लक्ष, ३९ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें सभासदांस ३½ लक्ष रुपये कर्जाऊ दिले असून १ लक्ष, ५८½ हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतविले आहेत. तिचे २ लक्ष, ८० हजार रुपये इतर बँकांकडे मुदती ठेवींत आणि ८३ हजार रुपये सेव्हिंग व चालू खात्यांवर आहेत. अहवालाचे वर्षअखेर भागीदारांची संख्या १,४८६ आहे. त्यांपैकीं ७०४ अर्जदारांस ३ लक्ष, ४१ हजार रुपयांचें कर्ज देण्यांत आलें. वसूल ३ लक्ष, ८० हजारांचा झाला. अहवालाचे वर्षीं पेढीस १३,७६५ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याकडे ६,१८० रुपयांचा विनियोग करण्याचें ठरलें. पेढीची वार्षिक साधारण सभा १७ जुलै रोजीं भरली होती. पेढीनें गेल्या २९ वर्षांत उत्कृष्ट प्रगति केली असून आपले पैसे योग्य तऱ्हेनें केव्हांहि जरूर पडेल तेव्हां उभे करतां येतील अशा रीतीनें गुंतविले आहेत, त्यामुळें, किफायतशीरपणाबरोबर सुरक्षिततहि साधली आहे.

---

### पश्चिम खानदेश ग. स. को. बँक लि. धुळें

( वार्षिक सभा : १८-९-३८ )

वरील बँकेच्या पटावर १०७३ सभासद असून अहवालाचे सालांत ७१ हजार रुपये वर्गणी जमा झाली आणि ४९½ हजार रुपये परत देण्यांत आली. म्हणजे वर्गणीची एकूण रकम ४ लक्ष, १ हजार झाली. कर्ज येणें १ लक्ष ९८½ हजार रुपये आहे. थकबाकीचें दिलेल्या कर्जाशीं प्रमाण ६·०५% पडतें. बँकेच्या इमारतीवर मजला बांधण्याचें काम पुरें होऊन सदर इमारतीचा उद्घाटन समारंभ मुंबई सरकारचे फडनवीस श्री. लठ्ठे यांचे हस्तें ता. २५ मे, १९३८ रोजीं झाला. सालअखेर बँकेस ३,९६१ रु. नफा झाला आहे, त्यांतून भागीदारांस द. सा. द. शे. ६½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्यासाठी २,८८० रुपये खर्च करावे, अशी कार्यकारी मंडळाची शिफारस आहे.

---

### अर्बन को. बँक लि., कराड

( वार्षिक सभा:४–९–३८ )

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ५९१ असून भाग भांडवल २८ हजार रुपये आहे. तिचेकडील ठेवींत आणि तिच्या खेळत्या भांडवलांत समाधानकारक वाढ होत आहे. १९३७-३८ अखेर तिचें येणें कर्जाची रकम २ लक्ष, ५७ हजार असून थकबाकीचें प्रमाण शेकडा ६·९ इतकेंच म्हणजे अल्प आहे. सिक्यूरिटीज व इमारत घसारा ह्यांसाठी नफ्यांतून २,४२५ रुपये बाजूस काढले आहेत आणि बँकेस निव्वळ नफा ६,१६५ रु.११ आ. ३ पै झाला आहे.त्यांतून भागीदारांस ७½टक्के दरानें डिव्हिडंड देण्यास २,१०० रुपयांचा विनियोग करावा असें डायरेक्टरांनीं सुचविलें आहे. बँकेचे रिझर्व्हज् आणि इतर फंड चांगले आहेत. जिनगीमध्यें दाखविण्यांत आलेले रोखे व भाग मूळ पडलेल्या किंमतीनें हिशेबांत घेण्याची पद्धति बँकेनें स्वीकारल्यास ताळेबंदाची मजबुती आणखी वाढेल. बँकेची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत आहे.

## भांडवली विमा कीं सहकारी विमा?

( लेः—श्री. डी. वाय. उपाचार्य, सुपरवायझर, नंदुरबार सुपरवायझिंग युनियन )

ता. १५-६-३८ च्या "अर्था" चे अंकांत सहकारी विम्यावर लिहिलेल्या लेखांत सहकारी विमा संस्था ही घटनेच्या दृष्टीनें इतर पुष्कळ प्रचलित विमा संस्थांपेक्षा निराळी कशी आहे हें दाखविण्याचा माझा उद्देश होता. विमेदारांच्या हितसंबंधाचें संरक्षण सहकारी विमा संस्थेंतच, इतर विमा संस्थांपेक्षा, होणें जास्त शक्य आहे हें विचारांतीं पटेल. या बाबतींत सहकारी विम्याच्या दृष्टीनें खालील मुद्दे विशेषतः लक्षांत घेण्याजोगे आहेत.

( १ ) विमेदारांचें प्रतिनिधित्व

( २ ) सरकारी तपासणी व देखरेख

( ३ ) कांहीं करांची माफी

( ४ ) लहान बिन-डॉक्टरी तपासणीचे विमे

( ५ ) मतदानाचा व साधारण सभेस हजर राहण्याचा विमेदारांस अधिकार

( ६ ) विमा न उतरणाऱ्या भागीदारांचा अभाव

सहकारी विमा कंपन्यांनीं नफा मिळविला तरी त्या नफ्याचे भागीदार सर्वस्वी सोसायटीचे सभासद म्हणजे विमेदार असतात. भांडवलशाही विमा कंपनीला होणाऱ्या नफ्याचा कांहीं भाग विमेदारांस मिळतो व बाकीचा कंपनीचे भागीदार स्वतः घेतात. विमेदारांच्या संख्येच्या मानानें भागीदार अगदी कमी असल्यानें एकंदरीनें नफ्याचा बराच मोठा हिस्सा भागीदारांच्या वाट्यास येतो असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या विमा कंपनीस १०,००० रु. नफा झाला व त्यांतील ९००० रु. विमेदारांत व १,००० रु. भागीदारांत वाटावयाचें ठरलें तर तेवढ्यावरून विमेदारांस जास्त रक्कम मिळाली असें होत नाहीं. विमेदारांच्या व भागीदारांच्या संख्येवरून कोणास नफा जास्त मिळतो हें कळेलच.

भांडवली शब्दाऐवजी भांडवलशाही शब्द वापरण्यांत त्या शब्दाचा अनिष्ट अर्थ नजरेसमोर यावा असा हेतु आहे व त्या दृष्टीनेंच तो वापरण्यांत आला आहे.

समाइक भांडवलाच्या विमा कंपन्यांत विमेदारांचें प्रतिनिधित्व बरेंच कमी असतें व त्यामुळें सर्वस्वी त्यांच्या हिताकडे पाहण्याची दृष्टि त्या प्रमाणांत कमी असणें संभवनीय आहे.

सहकारी विमा संस्थेस इतर सहकारी संस्थांचें पाठबळ मिळण्याची शक्यता बरीच असल्यानें तिचें खर्चाचें प्रमाण इतर विमा कंपन्यांच्या मानानें कमी असणें व्यवहार्य आहे.

भांडवली विमा कंपन्यांत व सहकारी विमा संस्थेंत तात्त्विक दृष्ट्या काय फरक आहेत व मूलतःच सहकारी संस्था विमेदारांच्या दृष्टीनें जास्त फायदेशीर ठरणें कसें शक्य आहे हें कळावें, हा सदरहु लेख लिहिण्याचा माझा उद्देश होता. भिन्न घटनेच्या विमा संस्थांवर टीका करावी हा उद्देश नव्हता व तसें त्यांनीं मानूनहि घेऊं नये असें सुचविणें जरूर वाटतें.

---

मस्कतच्या सुलतानानें हिंदुस्थानास भेट दिली, त्यानिमित्त हिंदुस्थान सरकारास ९½ हजार रुपये खर्च आला.

* *

पहिल्या वर्गाचे डबे अजीबात रद्द करण्याचे सुचनेस बहुतेक सर्व रेलवेजचा विरोध आहे.

## सहकारी बँकांची परिषद्

### मंजूर झालेले ठराव

मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांची परिषद् गेल्या आठवड्यांत मुंबई येथें प्रो. वा. गो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेंत अनेक ठरावांवर चर्चा झाली. मंजूर झालेल्या ठरावांत, मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांस एकत्र जोडणारा दुवा, ह्या दृष्टीनें उपयोगी पडणाऱ्या संस्थेची स्थापना करणारा ठराव अत्यंत महत्त्वाचा आहे. बँकांस योग्य तो सल्ला देऊन, त्यांच्या व्याजाचे दरांत आणि इतर व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्याचें काम ही संस्था करील आणि बँकांचें भांडवल शक्य तेवढें खेळतें रहाण्याविषयीं योजना सुचवील. रीऑर्गनायझेशन कमिटीच्या सूचनांवर परिषदेंत विस्तृत चर्चा झाली. स्टॅंप ड्यूटी आणि रजिस्ट्रेशन ड्यूटी ह्यांबाबत सहकारी बँकांस असलेली सवलत काढून घेण्याच्या सरकारच्या अपेक्षित योजनेस परिषदेनें तीव्र विरोध दर्शविला. मुंबई शहरांत ऑडिट फेडरेशन स्थापन करावें, ह्या रीऑर्गनायझेशन कमिटीच्या शिफारशीस परिषदेनें दुजोरा दिला. अर्बन बँकांनीं आपल्या सभासदांसंबंधीं एकमेकांस माहिती पुरवावी आणि एकाच क्षेत्रांत एकापेक्षा अधिक अर्बन बँका नोंदण्यांत येऊं नयेत असें परिषदेनें सुचविलें. पुण्यासारख्या १ लाखापेक्षा अधिक वस्तीच्या प्रमुख शहरांत इक्विटेबल मॉर्गेजच्या पद्धतीचा स्वीकार करतां येईल, अशी कायद्यांत दुरुस्ती होण्याबाबत रजिस्ट्रारनें प्रयत्न करावा, अशी परिषदेनें रजिस्ट्रारला विनंति केली. परिषदेंत सुमारें २० ठराव मंजूर झाले.

---

### पेण को. अर्बन बँक लि., पेण
### ( वार्षिक सभा: ३१-८-३८ )

वरील बँकेचा तिसरा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. अहवालाचे वर्षी बँकेचें खेळतें भांडवल १८ हजारांवर गेलें आणि एकूण व्यवहार सुमारें २½ लक्ष रुपयांचा झाला. सभासदांची संख्या ७४ झाली असून त्यांनीं १०६ भाग घेतलेले आहेत. वर्षअखेर बँकेस ४२० रु. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½ टक्के दरानें डिव्हिडंड द्यावें, असें डायरेक्टरांचें मत आहे. बँकेचें भाग भांडवल २,६५० रुपये असून रिझर्व्ह फंड ३७२ रुपयांचा आहे. बँकेकडील ठेवी वाढल्या म्हणजे प्रांतिक बँकेकडून कर्ज घेण्याची तिला आवश्यकता उरणार नाहीं. बँकेनें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे.

---


## कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें
# ३२ वार्षिक सभा

या बँकेची ३२ वी वार्षिक सभा नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे असेंब्ली हॉलमध्यें सन १९३७-३८ चा अहवाल, ताळेबंद, नफ्याची वाटणी मंजूर करणें व मे. रजिस्ट्रारसाहेब यांनीं सुचविलेल्या पोटनियमांत दुरुस्त्यांचा विचार करणें व निवडणुकी वगैरे कामासाठीं रविवार ता. २५ सप्टेंबर १९३८ रोजीं दुपारीं दोन वाजतां भरणार आहे. तरी सर्व सभासदांनीं अवश्य यावें.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून,
मा. के. कुलकर्णी,
सेक्रेटरी.

**विशेष सूचना:**—बँकेनें अल्प व्याजाच्या दरानें सोनें व चांदी ह्या तारणावर फक्त सभासदांस कर्जें देण्यास सुरुवात केली आहे. तरी सभासदांनीं या योजनेचा फायदा घ्यावा.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% कन्माक लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११७-१५ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०३—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८-१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९९—६ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—६ |
| २½% १९४८-५२ ... ... ... | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९-१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... ... | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०-१० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११७—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७४७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११८—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | ११०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३९२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | ९८०—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४२—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९-१३ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ४०—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४५१०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६३—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २८२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १३६०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १०९—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६-०-६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०-१४-० |

**६ टक्के मासिक आंवक ठेव**

डॉन ऑफ इंडिया च्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

**स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

# कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनार्थीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

# दि प्रॉव्हिन्शिअल बँक

## ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. ह्या व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट,
१७ मेनस्ट्रीट पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट,
लक्ष्मीरोड, पुणें. २

### मोटार कंपनीचा प्रचंड कारभार

जनरल मोटर्स कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका ह्या सुप्रसिद्ध अमेरिकन मोटार कंपनीच्या व्यवहाराचे १९३७ सालविषयक आकडे तिच्या अवाढव्य स्वरूपाचे निदर्शक आहेत. तिनें ह्या वर्षी एकूण सुमारें ४½ अब्ज रुपयांच्या मोटारी विकल्या. नफा ५० कोटींचे वर राहिला. कंपनीच्या भागीदारांची संख्या ३½ लक्ष इतकी आहे. ह्यांपैकी १ लक्ष, ६० हजार भागीदारांच्या मालकींत प्रत्येकी दहा किंवा दहापेक्षा कमी भाग आहेत. कामगारांना मजुरीचे रूपानें कंपनीनें सुमारें १२० कोटि रुपये दिले. कामगारांच्या रोजच्या हजेरीची सरासरी २,६१,९७७ इतकी होती. कंपनीच्या २१ लक्ष, १७ हजार मोटारगाड्या खपल्या. हा आकडा एकूण जागतिक उत्पादनाच्या शेकडा ३५ इतका आहे. कंपनीच्या कारखान्यांत शेवरोलेट, ब्यूक, कॅडिलॅक, ला सेल, पाँटिक आणि ओल्डस्मोबाईल ह्या गाड्या व जी एम सी., ओल्डस्मोबाईल आणि शेवरोलेट ट्रक्स तयार होतात. जर्मनीमधील ओपेल गाड्यांचा आणि इंग्लंडमधील व्हॉक्सॉल गाड्यांचा कारखाना हेहि वरील कंपनीच्या नियंत्रणाखालीच आहेत. लहान आकाराचीं डीझेल इंजनें तयार करण्याकडे कंपनी सध्या विशेष लक्ष पुरवीत आहे.

### ग्रेटब्रिटनमधील सिगारेटसचा खप

१९०७ सालीं ग्रेटब्रिटनमध्यें होणारें धूम्रपान मुख्यतः चिलमींच्या द्वारा होत असे; आतां सिगारेट्सनीं त्यांची जागा घेतली आहे. १९३५ सालीं सिगारेट्सच्या बनावटींत १४ कोटि, ८० लक्ष पौंड तंबाखूचा उपयोग करण्यांत आला आणि त्यापासून ४२ अब्ज, ६४ कोटि सिगारेट्स तयार झाल्या. १९२० ते १९३० च्या दरम्यान ग्रेटब्रिटनमधील सिगारेट्सचा खप दिडीनें वाढला, ह्याचें प्रमुख कारण स्त्रिया धूम्रपान करूं लागल्या, हें होय. तंबाखू, सिगार, सिगारेट्स इत्यादींचे वेगवेगळे २८ हजार प्रकार बाजारांत विक्रीस आहेत. तंबाखूविक्रीचे परवाने असणाऱ्या दुकानदारांची संख्या ५½ लक्ष, इतकी आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील आइसक्रीमचा धंदा

ग्रेट ब्रिटनमध्यें आइसक्रीम अत्यंत लोकप्रिय आहे आणि तें तयार करण्याचा धंदा हा एक राष्ट्रीय महत्त्वाचा धंदा होऊन बसला आहे. कॉमन्स सभेच्या एका सिलेक्ट कमिटीपुढें ह्या धंदाविषयीं कांहीं आकडे मांडण्यांत आले, ते उद्बोधक आहेत. सालिना सुमारें ५ कोटि गॅलन दूध आइसक्रीमच्या बनावटींत खपतें, असें त्यांवरून समजतें. ह्या धंद्यांत ३५ हजार पुरुषांस, हजारो स्त्रियांस आणि सुमारें १५ हजार मुलांस काम मिळतें. एवढा मोठा व्याप असलेल्या धंद्याचें नियंत्रण कायद्यानें करणें आतां आवश्यक झालें आहे. ज्या जागेंत हा धंदा चालवावयाचा ती जागा कायद्यानें घातलेल्या अटींप्रमाणें स्वच्छ असली पाहिजे आणि त्या जागेची सरकारांत नोंद असली पाहिजे, असा आइसक्रीमवाल्यांवर कडक निर्बंध आहे. कायद्यांतील निर्बंध पाळले जातात किंवा नाहीं हें पहाण्यासाठी वरचेवर तपासणीची व्यवस्था आहे आणि नियम मोडणारांस कडक शिक्षा केली जाते.

### महायुद्धांत इंग्लंडला सहाय करण्यास दक्षिण आफ्रिकेची तयारी !

महायुद्ध उद्भवून ग्रेट ब्रिटनवर संकट आल्यास दक्षिण आफ्रिका ग्रेट ब्रिटनचे सहायास जाईल असें आपलें वैयक्तिक मत असल्याचें जनरल स्मट्स ह्यांनीं दक्षिण आफ्रिकेच्या असेंब्लींत जाहीर केलें. सध्याच्या राज्यघटनेनें अशा युद्धांत पडण्याची अगर न पडण्याची दक्षिण आफ्रिकेस मोकळीक ठेवलेली असली, तरी माझ्या हातीं यूनियन सरकारचीं सूत्रें असल्यास युद्धांत पडण्याचाच मी दक्षिण आफ्रिकेच्या असेंब्लीस सल्ला देईन, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें.


'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें  १२ तासांत कपडे शिवून मिळतील.  [ खादी भांडाराचे माडीवर

**पराडकर टेलर्स ॲकॅडेमी**

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.**

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेपर्यंत मिळून त्याखेरीज रु. ५०००।– रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शें. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस्  एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

**धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.,** लक्ष्मीरोड, पुणें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा  चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

**संगीत-मार्गदर्शक**

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

**सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा**

मोती चौक : : : सातारा

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें